# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440


**परिपत्रक क्र. ३७३/२०२६**

**विषय : परिपत्रक क्र. १२५/२०११ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पर्यंत महाविद्यालयांकडे वर्ग केलेल्या अभ्यासक्रमांमधील बी.व्होक. व एम.व्होक. अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील परीक्षांच्या आयोजनाबाबत.**

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पर्यंत महाविद्यालयांकडे वर्ग केलेल्या सर्व विद्याशाखांतील अभ्यासक्रमांस (पदवी, पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यापीठाने परीक्षा विषयक वेळोवेळी विहित केलेले नियम, अटी व शर्ती यांच्या अधीन राहून विद्यापीठ स्तरावर करण्यात येणार असल्याचे परिपत्रक क्र.२२९/२०२५, परीक्षा-समन्वय/७२७, दिनांक ०४.९.२०२५ अन्वये कळविण्यात आलेले होते. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांना त्यांचे अभ्यासक्रम व मान्यतेची कागदपत्रे सादर करण्याकरिता विद्यापीठ संकेतस्थळावर परिपत्रक क्र.२६४/२०२५, जा.क्र.८१९, दिनांक ३१.१०.२०२५ अन्वये लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच महाविद्यालयांकडून माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता वेळोवेळी बैठका व कार्यशाळेचे आयोजनही विद्यापीठामार्फत करण्यात आलेले होते. ज्या महाविद्यालयांची अचूक माहिती प्राप्त झालेली आहे, अशा महाविद्यालयांमध्ये राबविण्यात आलेल्या अभ्यासक्रमांची परीक्षा फॉर्म व परीक्षा आयोजनाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. विद्यापीठ स्तरावरील पूर्वनियोजित उन्हाळी सत्र परीक्षा २०२६ चे आयोजन व सदर परीक्षांचे निकाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीतच लावण्याकरिता उपरोक्त नमूद परिपत्रक क्र. १२५/२०११ अंतर्गतच्या उर्वरित परीक्षांच्या आयोजनाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, दिनांक ०७ मे, २०२६ रोजीच्या स्थितीस अनुसरुन, परिपत्रक क्र. १२५/२०११ अंतर्गतच्या, परीक्षा अर्जाची प्रक्रिया पूर्ण झालेल्या व अपूर्ण राहिलेल्या **बी.व्होक. व एम.व्होक.** अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्यापर्यंत विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या नाहीत; तसेच सदर अभ्यासक्रमांच्या परीक्षांची वेळापत्रकेही विद्यापीठ संकेतस्थळावर अद्यापर्यंत प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत, अशा **उर्वरित सर्व बी.व्होक. व एम.व्होक.** अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील परीक्षा महाविद्यालय स्तरावर, पूर्वीप्रमाणेच विहित प्रक्रिया पूर्ण करुन आयोजित कराव्यात.

सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक संबंधित महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे विद्यार्थी, शिक्षक व इतर घटकांच्या निदर्शनास आणून द्यावे.

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र.७४५, दिनांक: ०९.०५.२०२६

(प्रा.डॉ.राजेंद्र तलवारे)
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश, कार्यवाही पुर्ण करुन, अहवाल परीक्षा विभागास सादर करावा.**

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :**
१) मा.प्रभारी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
३) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.
४) उपकुलसचिव, गोपनीय कक्ष व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग.
५) विभागप्रमुख, व्यवस्थापन माहिती कक्ष, परीक्षा विभाग.
६) उपकुलसचिव, गोदाम कक्ष, परीक्षा विभाग.